# प्रेसनोट

स्कॉच शिखर परिषदेत महाराष्ट्र राज्याने १८ पारितोषिके जिंकली !!!

स्कॉच ग्रुप (Skoch Group) ने आयोजित केलेल्या ३३ व्या शिखर परिषदेत महाराष्ट्र राज्याच्या १८ ई-गव्हर्नन्स प्रकल्पांची स्कॉच ऑर्डर ऑफ मेरिट आणि प्रमाणपत्रासाठी निवड झालेली आहे. या प्रकल्पाशी संबंधितांना दि. २ सप्टेंबर, २०१३ रोजी दिल्ली येथे सन्मानित करण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये देशातील सर्व राज्यांनी भाग घेतला होता. या स्पर्धेत एकाच राज्याने १८ पारितेषिके मिळविणे हि महाराष्ट्रासाठी कौतुकास्पद बाब आहे. यामुळे राज्याची ई-गव्हर्नन्स क्षेत्रातील देशातील आघाडी पुन्हा एकदा सिद्ध झालेली आहे.

स्कॉच ऑर्डर ऑफ मेरीट करिता निवड प्रक्रिया अतिशय काटेकोर असून प्रस्तुत प्रकल्पांचे मुल्यांकन सादरीकरणाच्या आधारे ज्युरीकडून केले जाते. या ज्युरीमध्ये डॉ. विजयादित्य, माजी महासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, श्री. रवि सक्सेना, माजी अतिरिक्त मुख्य सचिव, गुजरात, श्री. समीर कोचर, चेअरमन, स्कॉच इत्यादींचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्याच्या पाच ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची स्कॉच पारितोषिकासाठी निवड झालेली आहे. हि संख्या सर्वाधिक आहे. राज्यातील स्कॉच ऑर्डर ऑफ मेरीट प्रकल्प खालीलप्रमाणे आहे. :-

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | विभागाचे नाव |
|---|---|---|
| १ | ई-गव्हर्नन्स ट्रेनिंग अँड सर्टिफिकेशन | माहिती तंत्रज्ञान संचालनालय |
| २ | ई-ऑफीस इम्लीमेंटेशन अॅट मंत्रालय | माहिती तंत्रज्ञान संचालनालय |
| ३ | महागोव्ह क्लाऊड इम्लीमेंटेशन बाय गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र | माहिती तंत्रज्ञान संचालनालय |
| ४ | युआयडी लिंक्ड सर्विस डिलिव्हरी | माहिती तंत्रज्ञान संचालनालय |
| ५ | सेंटर ऑफ एक्सलन्स इन मराठी लँगवेज | माहिती तंत्रज्ञान संचालनालय व सिडॅक |
| ६ | पेपरलेस ऑफीस अॅट सिंधूदूर्ग | कलेक्टर ऑफीस सिंधूदूर्ग |
| ७ | इंटिग्रेटिंग द इन्फॉर्मल सेक्टर इन म्युनसिपल सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट | पुणे म्युनसिपल कॉर्पोरेशन |
| ८ | पॉवर जनरेशन फ्रॉम सॉलीड वेस्ट इन सबर्बन एरिया पीएनसी. | पुणे म्युनसिपल कॉर्पोरेशन |

| | | |
|---|---|---|
| ९ | पुणेज ट्रॅश सोल्युशन - अ झिरो गारबेज सिटी | पुणे म्युनसिपल कॉर्पोरेशन |
| १० | रिअल टाईम क्रेन क्रशिंग इन्फॉरमेशन कलेक्शन युजिंग पूल एसएमएस गेटवे | शुगर कमिशनर ऑफीस |
| ११ | वेब पोर्टल फॉर शुगर कमिशनर | शुगर कमिशनर ऑफीस |
| १२ | आशा ॲप्लीकेशन | नॅशनल रुरल हेल्थ मिशन |
| १३ | कॉमप्रिहेन्सिव्ह ट्रान्सफॉरमेशन ऑफ महाराष्ट्र स्टेट एक्साईज डिपार्टमेंट | एक्साईज डिपार्टमेंट |
| १४ | ई-मोजणी प्रोजेक्ट | सेटलमेंट कमिशनर |
| १५ | हेल्थ केअर ॲंड ॲकॅडेमिक्स मॅनेजमेंट ॲंड इन्फॉरमेशन सिस्टीम | मेडीकल एज्युकेशन |
| १६ | मायनॉरिटी स्टेटस ॲप्लीकेशन | मायनॉरिटी डिपार्टमेंट |
| १७ | मिशन नाग रिव्हर क्लीनींग, नागपूर | नागपूर म्युनसिपल कॉर्पोरेशन |
| १८ | विश्वास- व्हिजिटिंग इन्फॉरमेशन ऑन स्कुल हॅंडेड व्हिथ अटेंडन्स सिस्टीम | नागपूर जिल्हा परिषद |

श्री. राजेश अग्रवाल, सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी राज्याला पारितोषिक मिळाल्याचा आनंद व्यक्त केला असून यामुळे राज्य शासनाची नागरिकाला उत्कृष्ट सेवा देण्याचा ध्यास आणि कटिबद्धता सिद्ध झालेली आहे.